महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांकः प्रतिनि-२०१७/प्र.क्र.१३४/चौदा
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: २२.०९.२०१७

आदेश

श्रीमती चित्रकला नि.सूर्यवंशी, सह सचिव, विधी व न्याय विभाग यांची अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, मुंबई शहर या पदावर प्रथमत: एक वर्षाकरीता प्रतिनियुक्तीने नियुक्ती खालील अटींच्या व शर्तींच्या अधीन राहून करण्यात येत आहेत.

(अ) श्रीमती चित्रकला नि.सूर्यवंशी, सह सचिव ज्या तारखेला शासकीय सेवेतील पदाचा कार्यभार सुपूर्द करतील त्या तारखेपासून प्रतिनियुक्तीच्या सेवेचा प्रारंभ होईल आणि ती सेवा ज्या तारखेला श्रीमती चित्रकला नि.सूर्यवंशी, सह सचिव आपल्या शासकीय पदाचा कार्यभार पुन्हा स्वीकारतील, त्या तारखेला समाप्त होईल.

(ब) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन / सक्षम प्राधिकारी राखून ठेवील.

(क) जर त्यांची सेवा स्वीयेत्तर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही तर त्याला मूळ विभागाकडे परत पाठविण्याची मुभा स्वीयेत्तर नियोक्त्याला राहील. मात्र, याप्रमाणे परत पाठविण्यापूर्वी स्वीयेत्तर नियोक्त्याने शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे; आणि

(ड) त्यांनी मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे अशी कमीत कमी ३ महिन्यांची लेखी नोटीस शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला दिल्यानंतर त्यांना मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील.

२. म.ना.से.(पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा....इ.) नियम १९८१ मधील नियम ४० (परिशिष्ट-२) मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती विचारात घेऊन, प्रतिनियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व विधी व न्याय विभाग यांनी आपापसात सल्लामसलत करून ठरवाव्यात.

३. श्रीमती चित्रकला नि.सूर्यवंशी, सह सचिव यांच्या प्रतिनियुक्तीबाबतच्या इतर सर्व प्रशासकीय बाबी विधी व न्याय विभाग यांचेमार्फत हाताळण्यात येतील.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७०९२२१७५३३९८६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Imtiyaz
Mushtaque Kazi

Digitally signed by Imtiyaz Mushtaque Kazi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=711589caceff9b0bb07e3c6556e724501d0c5ea5c63b3146314d51ec0e87d0a6, cn=Imtiyaz Mushtaque Kazi
Date: 2017.09.22 17:43:01 +05'30'

(इ.मु.काझी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव
३. मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
५. अपर मुख्य सचिव (सेवा),सा.प्र.वि., मंत्रालय, मुंबई,
६. अ.मु.स./प्रधान सचिव/ सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / विधी व न्याय विभाग / महसूल व वन विभाग, मंत्रालय,
७. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, १ ला मजला, सखाराम पाटील मार्ग, सीबीडी बेलापूर, सेक्टर-६, नवी मुंबई,
८. सह/उप सचिव - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / विधी व न्याय विभाग / महसूल व वन विभाग, मंत्रालय,
९. श्रीमती चित्रकला नि.सूर्यवंशी, सह सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, मुंबई शहर, पंचशिल एम-१, तळमजला, सिध्दार्थ गृहनिर्माण संस्था, लेबर कॅम्प, वाल्मिक रोड, माटुंगा, मुंबई-२१.
११.निवडनस्ती कार्यासन-१४.